रयत शिक्षण संस्थेचे
अण्णासाहेब आवटे आर्टस, कॉमर्स,
हुतात्मा बाबू गेनू सायन्य महाविद्यालय
मंचर ता.आंबेगाव, जि.पुणे

दि. 8 June 2022

# ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना खालील कागदपत्रे अपलोड करावीत

**१) मागील परीक्षेचे मार्कलिस्ट**

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना मागील वर्षातील परीक्षेचे ओरीजनल मार्कशिट स्कॅन करुन जोडावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना अद्याप ओरीजनल मार्कशिट प्राप्त झालेली नाहीत अशा विद्यार्थ्यांनी वेबसाईटवर मिळणाऱ्या मार्कशिटची प्रत जोडावी/ अपलोड करावी. विद्यार्थ्यी जो पर्यत ओरीजनल मार्कशिट व त्याच्या दोन झेरॉक्स महाविद्यालयात जमा करणार नाहीत तो पर्यत विद्यार्थ्याचा प्रवेश नियीमत होणार नाही याची नोंद घ्यावी.

**२) जात प्रमाणपत्र**

सिनिअर कॉलेज मध्ये मेरीटसाठी प्रवेश फॉर्म जमा करताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र किंवा जात पडताळणी प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र व जात पडताळणी नसलेल्या/ अपलोड न केलेल्या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी म्हणून ग्राहय धरले जाईल. सदर विद्यार्थ्यांचा नंबर जात प्रमाणपत्र नसल्यामुळे विनाअनुदानित तुकडी मध्ये गेल्यास होणाऱ्या नुकसानीस संबंधीत विद्यार्थी जबाबदार राहील याची नोद घ्यावी.

**३) मुळ दाखला**

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी मूळ दाखल्याची स्कॅनप्रत वेबसाईटवर अपलोड करावी. सदरचा दाखला महाविद्यालयात जमा करणार नाहीत तो पर्यत विद्यार्थ्याचा प्रवेश नियीमत होणार नाही याची नोंद घ्यावी.

मूळ दाखला उपलब्ध नसल्यास तसा विनंती अर्ज वेबसाईटवर अपलोड करावा. परंतू याबाबत मा.प्राचार्य यांचा निर्णय कायम राहील यांची नोंद घ्यावी.

तसेच महाविद्यालयात जमा केलेले मुळ दाखले महाविद्यालयातुन परत दिले जाणार नाहीत. सदर दाखल्यांच्या आवश्यक तेवढया झेरॉक्स आपणाकडे काढुन ठेवाव्यात.

दुबार (Duplicate) दाखल्यावर कोणत्याही प्रकारे प्रवेश होणार नाही याची नोंद घ्यावी.

**४) शैक्षणिक खंड असल्यास शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (Educational Gap Certificate).**

जे विद्यार्थी एप्रिल २०१९ किंवा त्यापुर्वी शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी स्टॅम्पपेपरवर शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (Educational Gap Certificate ) ओरीजनल अपलोड करणे आवश्यक आहे.

**५) आधार कार्ड**

**६) इतर आरक्षण (खेळाडू,माजी सैनिक पाल्य,अपंग इ.) असल्यास त्यासंबंधीत कागदपत्रे.**

**७) फोटो व सही**

**सूचना :** विद्यार्थ्यांनी मेरीटसाठी फॉर्म भरताना सर्व माहीती बिनचुक भरावी व त्यासाठी लागणारी कागदपत्रे व्यवस्थित दिसतील अशी अपलोड करावीत. चुकीची अथवा अर्धवट माहीती भरलेला फॉर्म तसेच व्यवस्थित कागदपत्रे दिसत नसलेला फॉर्म कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय बाद करण्यात येईल व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस संबधित विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी.

प्रवेश समन्वयक
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर

ANNASAHEB AWATE COLLEGE MANCHAR

प्राचार्य,
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर